# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 14/12/2021 (मंगळवार)


---

## अट्टल मोटरसायकल चोरी करणाऱ्या आरोपीतांना केले जेरबंद
## स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण यांची कारवाई

दि. १३/१२/२०२१ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक उपविभाग कन्हान हद्दीत गस्त करीत असतांना त्यांना खात्रीशीर माहिती मिळाली की, विषयांकित आरोपी क्रं. १ पंकज पांडुरंग टुल्ले वय ३० वर्षे रा. शिवाजी नगर झोपडपट्टी महाल नागपूर याचे कडे चोरीची ॲक्टीवा गाडी असुन तो सध्या टेकाडी पुला जवळ एका मित्रासोबत उभा आहे. या बातमीची शहानीशा केली असता दोन इसम पांढ—या रंगाच्या ॲक्टीवा गाडीजवळ टेकाडी पुलाचे खाली उभे होते. त्यांचे जवळ जावुन त्यांची विचारपुस केली असता, त्यांनी आपले नांव १) पंकज पांडुरंग टुल्ले वय ३० वर्षे रा. शिवाजी नगर झोपडपट्टी महाल नागपूर २) रितु इंद्रजीत पुरे वय ३१ वर्षे रा. संताजी नगर वार्ड न. ५ कांद्री कन्हान असे सांगितले. त्यांना त्यांचे ताब्यातील गाडी बाबत विचारपुस केली असता, त्यांनी गाडी बाबत उडवाउडवीचे उत्तरे देत असल्याने, आमचा संशय वाढल्याने त्यांना ताब्यात घेवुन गाडी बाबत सखोल विचारपुस केली असता, आरोपी क्रं. १ पंकज यांनी सांगितले की, त्याचे ताब्यातील ॲक्टीवा गाडी ही त्याने एकटयाने नागपुर शहर येथून चोरी केल्याची सांगितले. तसेच नागपूर शहर येथुन वेगवेगळया ठिकाणावरून आणखी चार गाडया चोरी केल्याचे कबुल केले. आरोपी क्रं. २ रितु पुरे याचे सोबत पोस्टे कन्हान हद्दीतील मौजा खोपडी येथुन काळया रंगाची ॲक्टीवा गाडी चार महिण्यापुर्वी चोरी केल्याचे सांगितले. वरून आरोपी क्र. २ रितु पुरे याचे घरून खालील गाडया जप्त करण्यात आल्या..

| अ. क्र. | पोलीस स्टेशन | अप.क्र. व कलम | गाडी क्रमांक व चेंसिस क्रमांक | गाडीचा प्रकार | किंमती |
|---|---|---|---|---|---|
| १ | गणेशपेठ नागपूर शहर | ४६५/२१क. ३७९ भादंवि | MH-49 BD-5940 ME4KC311MJ8473138 | होंडा युनिकॉर्न | ४००००/— रु |
| २ | लकडगंज नागपूर शहर | ७०२/२१क. ३७९ भादंवि | MH-49 V-3227 MBLHA10AME8829245 | हिरो स्प्लेंडर | २०,०००/—रु. |
| ३ | बर्डी नागपूर शहर | ५१८/२१ क. ३७९ भादंवि | MH-40 AB-4486 ME4JC448LC7646514 | होन्डा ॲक्टीवा | २०,०००/— रु |
| ४ | नागपूर शहर | भाजी मंडी चौक इतवारी येथून एक महिण्यापुर्वी चोरलेली | MH-31 DF-1401 MBLHA10ELA9C03381 | पॅशन प्लस | ४०,०००/— रु |
| ५ | नागपूर शहर | मेडीकल चौक संगम हॉटेल जवळुन एक महिण्यापुर्वी चोरलेली | MH-31 ED-8149 MBLHA10ALCHE80698 | स्प्लेंडर प्लस | ४०,०००/— रु |
| ६ | कन्हान | २६५/२१ क. ३७९,३४ भादंवि | MH-40 BQ-0589 ME4KC311MJ8473138 | ॲक्टीवा होंन्डा | ६०,०००/— रु. |

नमुद आरोपीतांचे ताब्यातुन एकूण ६ मो.सा.एकूण किमंती १,६०,०००/—रू चा माल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक श्री विजयकुमार मगर, अपर पोलीस अधीक्षक श्री राहूल माकणीकर यांचे मार्गदर्शनात पोलिस निरीक्षक अनिल जिट्टावार स्था.गु.शा. यांचे नेतृत्वात सपोनि अनिल राऊत स्था.गु.शा.ना.ग्रा. पोहवा विनोद काळे, ज्ञानेश्वर राउत, अरविंद भगत, नापोशि शैलेश यादव, सत्यशिल कोठारे, पोशि विरेंद्र नरड, प्रणयसिंग बनाफर चासफौ साहेबराव बहाळे व पो.स्टे. कन्हान येथील पोहवा श्रावणकर, नरेश वरखडे, नापोशि राहुल रंगारी, पोशि सुधिर चव्हाण यांनी पार पाडली.




मुद्देमाल व अटक आरोपीतांसह स्थानिक गुन्हे शाखेचे पथक

## घरफोडी

पो.स्टे. केळवद :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावरील केळवद बाजार चौक येथे दिनांक 13/12/21 चे 23.00 वा. ते दिनांक 14/12/21 चे 04.30 वा. दरम्यान फिर्यादी नामे– ओमप्रकाश भास्करराव ढोबळे वय 42 वर्ष रा. वार्ड क्रं. 05 केळवद यांचे ओम किराणा दुकाणाच्या शटरचे अज्ञात आरोपीने लॉक तोडुन दुकानात प्रवेश केला. यानंतर आरोपीने चिल्लर व नगदी 31,000/–रु. व किराणा साहित्य किमती 2,000/–रु. असा 33,000/–रु. चा माल तसेच शेजारी सुधाकर बांदरे यांचे ज्वेलरी दुकाणाचे शटरचे अज्ञात आरोपीने लॉक तोडुन आतील सी.सी.टि.व्ही कॅमेऱ्याची डि.व्ही.आर मशीन किमती 15,000/–रु. तसेच शेजारी रुपेश तळेकर यांचे नकुल किराणा स्टोअर्स चे शटरचा अज्ञात आरोपीने ताला तोडुन आत प्रवेश करुन काउंटर मधील 35,060/–रु. नगदी व शेजारी सुधाकर उईके यांचे प्राची किराणा स्टोअर्सचे शटरचे ताला तोडुन आत प्रवेश करुन 750/–रु. असा एकुण कि. 83,810/–रु. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने दुकाणाचे शटरचे कुलुप तोडुन आत प्रवेश करुन चोरुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि श्री नासरे हे करीत आहे.

## चोरी

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि.मी. अंतरावरील राहते घर लिंगा पारडी येथे दिनांक 12/12/21 चे 15.30 वा. ते दिनांक 13/12/21 चे 18.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– बाबाराव संतोषरावजी राउत, वय 54 वर्ष, रा. लिंगा पारडी यांचे घराचे बांधकाम चालु असल्याने घराच्या अंगणात बाहेर ठेवलेले सामान व लाकडी दिवान मधील नगदी 50,000/–रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक सुनिल ठोंबरे 9011026414 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत धानला येथे दिनांक 12/12/21 चे 08.30 वा. ते 17.30 वा. अज्ञात आरोपीने गायत्री मंदिरातील 1) चांदीचा मुकुट किं 10,000, 2) इतर सोण्याचे दागीने किं 21,000/–रू. असा एकुन कि. 31,000/–रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

. सदर प्रकरणी फिर्यादी नामे– खुशाल परशुराम मते, वय 46 वर्ष, रा धानला यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार यंगलवार 9423219429 हे करीत आहे.

## अपघातात मृत्यू

पो.स्टे. अरोली :– अंतर्गत मौजा मोरगाव फाटा जिल्हा सामान्य रूग्णालय भंडारा येथे दिनांक 10/12/21 चे 19.10 वा. ते 11/12/2021 चे 08.15 वा. दरम्यान सेवकराम श्यामराव कावळे (मृतक) वय 44 वर्ष रा. मोरगाव ता.मौदा यांचा दिनांक 10/12/21 ला मौजा मोरगाव फाटाजवळ अज्ञात वाहणाने अपघात केला. त्यांना उपचाराकामी जिल्हा ग्रामीण रूग्णालय भंडारा येथे भरती केले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी मृत घोषीत केले. सदर प्रेताचे पि.एम.भंडारा येथे मर्ग क्र. 00/21 कलम 174 जा.फौ. प्रमाणे दाखल करूण संबधीत कागदपत्र पो.स्टे. अरोली ला प्राप्त झाल्याने सदर गुन्हा नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार जयप्रकाश ठाकुर पो.स्टे. अरोली यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. अरोली येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 134(अ)(अ) मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री कोळी मो.नं. 8080872474 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. कुही :– दिनांक 12/12/2021 चे 16.00 वा. ते 16.15 वा. दरम्यान वय 17 वर्ष अल्पवयीन फिर्यादी/पीडित ही घरी एकटीच हजर असतांना आरोपी नामे– राहुल केवलराम चाफले, वय 26 वर्ष, रा. पारडी ता. कुही जि.नागपुर हा विळी मागण्याच्या कारणाने फिर्यादीच्या घरात गेला आणि फिर्यादीच्या एकटेपणाचा फायदा घेवुन तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम 354 (अ)(1),451 भादंवी. सहकलम 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि सुचिता मंडावले मो.क्र. 9763234548 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर